प्रेस नोट २० दिनांक १७/१०/२०२४

## ट्रॉम्बे पोलीसांनी सराईत गुन्हेगाराकडून ०१ देशी बनावटीचे अग्निशस्त्र व ०२ जीवंत काडतुसे हस्तगत केलेबाबत

ट्रॉम्बे पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथक पोलीस ठाणे हद्दीत गस्त करीत असताना पोलीस ठाणे अभिलेखावरील सराईत आरोपी आदित्य शाम पारखे उर्फ मिठ्ठू, वय २५ वर्षे हा संशयित हालचाली करीत असल्याचे दिसून आल्याने पोलीस पथकाने त्याची अंगझडती घेतली असता त्याचेकडे ०१ देशी बनावटीचे अग्निशस्त्र व २ जिवंत काडतुसे मिळून आली. त्याचेविरोधात ट्रॉम्बे पोलीस ठाणेस कलम ३,२५ शस्त्र अधिनियम सह कलम ३७ (१) (अ), १३५ मपोका अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

आदित्य शाम पारखे उर्फ मिठ्ठू, वय २५ वर्षे हा सराईत गुन्हेगार असून त्याचेवर १२ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. सध्या आरोपीत हा पोलीस कोठडी रिमांडमध्ये असून पुढील तपास पोउनि शरद नाणेकर व पथक करीत आहेत.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा. डॉ. श्री. महेश पाटील, अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, मुंबई, श्री. नवनाथ ढवळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - ६, मुंबई, श्री राजेश बाबशेट्टी, सहायक पोलीस आयुक्त, ट्रॉम्बे विभाग, प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, फरीद खान यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोउपनि शरद नाणेकर, सपोउनि ३००१९/रमेश धुमाळ, पो.ह.क्र. ९६०१५९/आव्हाड व पो.शि. क्र. ०७-११५४/देशमुख यांनी केली.

-----------------